## आम्ही

जगाची झोकुनी दुःखे सुखाशी भांडतो आम्ही
स्वतःच्या झाकुनी भेगा मनुष्ये सांधतो आम्ही

फुकाचे काय शब्दांना मिळे दिव्यत्व सत्याचे
घराची राखरांगोळी कपाळी लावतो आम्ही

कुण्याही चंद्रभागेचा किनारा प्यार आम्हाला
तिथे नाचे विठू झेंडा जिथे हा रोवतो आम्ही

तुरुंगातील स्वप्नांची आम्ही धुंडाळितो स्वप्ने
वधस्तंभांसवे दाही दिशांना हिंडतो आम्ही

दिले प्रत्येक वस्तीला आम्ही आकाश सोनेरी
जिथे जातो तिथे हाका उषेच्या वाटतो आम्ही

**जरी या वर्तमानाला कळेना आमुची भाषा**
**विजा घेऊन येणाऱ्या पिढयांशी बोलतो आम्ही**

सुरेश भट
एल्गार

मला वाटतं १९८० चा सुमार असावा. दूरदर्शनवर वैदर्भीय मराठी कवीसंमेलन होते. त्यात सुरेश भट हे नाव पुकारले गेले आणि टाळयांच्या कडकडाटात भटांनी त्या प्रेक्षागृहाचा ताबा घेतला. पुढचा अर्धा तास कसा गेला ते कळलेच नाही. त्यांनी सुरुवातीलाच गायलेली कविता

अद्यापही सुऱ्याचा मजला सराव नाही
अद्यापही पुरेसा हा खोल घाव नाही

ही आमच्या मनाचा ठाव घेऊन गेली. मी आणि समीर, भटांचा विषय डोक्यात आला की हटकून ह्या ओळी म्हणतोच.

तोपर्यन्त मेंदीच्या पानावर, मलमली तारूण्य माझे, मालवून टाक दीप या गाण्यांचे गीतकार एवढीच आम्हाला त्यांची ओळख होती. पण आजचा हा आवेश आणि भाव काही वेगळेच वाटले.

मग "रंग माझा वेगळा" वाचले आणि हा वेगळा रंग खूप आवडायला लागला.

आजची आम्ही ही कविता तशाच जातकुळीतली आहे.

केशवसुतांच्या "आम्ही कोण म्हणूनि काय पुसता" या कवितेशी नाते सांगावे असा आत्मविश्वास ठायीठायी या कवितेत दिसतो.

ही कविता लिहीली असावी बहुधा क्रांतिकारक किंवा समाजसुधारकांना समोर ठेवून.

आपल्या आयुष्याची राखरांगोळी होणार हे दिसत असतांनाही आपल्या ध्येयापासून अविचल न होणारी ही माणसं. तुरुंग, वधस्तंभ याला आयुष्याचा अविभाज्य भाग नव्हे तर त्या स्वप्नात रमणारी.
इतरांच्या आयुष्यात सोन्याचे दिवस यावेत म्हणून झटणारे हे लोक आपल्या तन-मन-धनाच्या भेगा बाहेरील कुणाला दिसू नयेत, जाणवूही नयेत इतक्या बेमालूमपणे सांधतात.

आपल्या कार्याबद्दलचा दृढ निश्चय इतका ठाम आहे की आम्ही कुठल्याही वाळवंटात झेंडा रोवला तरी विठ्ठल तेथे येईल आणि त्या कार्याला उभारी देईल असे ते म्हणतात.

सुरेश भट यांच्या खूप कवितांमध्ये आणि लिखाणात कडवटपणा आणि विद्रोहाचा भाव आढळतो. लहानपणीच आलेले शारीरिक व्यंग आणि त्यामुळे झालेली अवहेलना याचा त्यांच्या विचारांवर खूप परिणाम झाला होता. त्यात नंतरच्या काळात गझलेला काव्यप्रकार म्हणून मान्यता मिळावी म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नांना अभिजनांनी फारसा प्रतिसाद दिला नाही आणि त्यावर टीकाच केली याचे वैषम्यही मिसळले गेले.

वास्तविक त्यांची बरीचशी गाजलेली गीते- मलमली तारुण्य माझे, मेंदीच्या पानावर, मग माझा जीव तुझ्या- ही १९५८-६० च्या दरम्यान लिहून झाली होती. पण त्याला चाली लावून लोकांसमोर यायला बारा पंधरा वर्षे लागली.
उषःकाल होता होता हे गाणे त्यांनी १९६४ साली लिहीले होते, ते सिंहासन या चित्रपटामुळे लोकप्रिय झाले आणि ते आणीबाणीविषयी लिहीले होते असा गैरसमज दृढ झाला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी त्यांनी मराठीच्या अभिमानाविषयी लिहीलेली गीते शाहीर अमरशेख यांनी अजरामर केली पण भटांनी त्याचा कधीही गवगवा केला नाही मग त्याचे भांडवल करणे तर दूरच राहिले.

गझल हा काव्यप्रकार लोकांना समजावा म्हणून भटांनी लेख लिहीले, व्याख्याने दिली, काव्यगायनाचे, वाचनाचे कार्यक्रम केले. रदीफ आणि काफिया असे कधीही न ऐकलेले शब्द मग लोकांच्या बोलण्यात येऊ लागले. अस्सल आणि कमअस्सल

*गझलेतील फरक किमान जाणवू लागला पण तरीही भटांना म्हणावे तसे त्याचेही श्रेय मिळाले नाही. याचीच खंत त्यांना वाटत असावी असे आजच्या कवितेचे शेवटचे कडवे वाचल्यावर वाटते.*

*जरी या वर्तमानाला कळेना आमुची भाषा*
*विजा घेऊन येणाऱ्या पिढयांशी बोलतो आम्ही*

*त्यांची भाषा त्यावेळच्या पिढीला कळली नाही पण आज अनेक उत्कृष्ट गझलकार मराठीत रचना करतात. विजा घेऊन आलेल्या पिढीने त्यांची ही अपेक्षा पूर्ण केली. मराठी काव्यसंपदेचा गझल हा अविभाज्य घटक बनला आहे, ह्याचा पाया जरी माधव ज्यूलियनांनी घातला तरी कळसाचा मान सुरेश भटांचा हे निर्विवाद सत्य नाकारता येणार नाही.*

*सुरेश भट खूप पारदर्शी आयुष्य जगले आणि आपल्याला वाटलेल्या गोष्टी त्यांनी तितक्याच निर्भीडपणे लोकांसमोर कुठलाही अभिनिवेश न ठेवता मांडल्या. असाच त्यांचा एक निर्भय विचार लिहून आवरते घेतो.*

*"ज्या समाजात मी जन्मलो, त्याचा विचार केला तर भौतिकदृष्ट्या माझी मते मला परवडत नाहीत. प्रवाहाविरुद्ध पोहणे म्हणजे एक यातनाच असते. पण जे हृदयाला पटते, त्याविरुद्ध वागणे म्हणजे त्याहून मोठी यातना असते.* ***मी पहिली यातना निवडली!"***

***मन्दार***